PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA

KAVATHE MAHANKAL, DIST – SANGLI

# DEPARTMENT OF GEOGRAPHY

# FIELD-WORK

**(ACADEMIC YEAR 2023-24)**

**Date:** 09/01/2024

**'Shikshan Prasarak Sanstha's**

**Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal**

# DEPARTMENT OF GEOGRAPHY

## REPORT OF FIELD-WORK (2023-24)

| | |
|---|---|
| **Title** | Field Work on Landuse and Land survey of Thabadewadi Village |
| **Place** | Thabadewadi Tal – Kavthe Mahankal Dist - Sangli |
| **Day & Date** | Tuesday, 09 January 2024 |
| **Organizer** | Department of Geography |
| **Participants** | Teachers – 2 Students – 20 Total - 22 |
| **Co-ordinator** | Mr. D. M. Godase Assistant Professor, Department of Geography |
| **Background** | The geographical village survey aims to provide third-year BA students with a practical understanding of local landscapes and Landuse detail of Focused on Thabadewadi, this survey delves into the village's topography, land use patterns, demographic characteristics, and cultural aspects. As students explore the geographical dynamics. This hands-on approach equips students with valuable fieldwork experience, enhancing their analytical skills in the realm of geography. |
| **Objective** | • Investigate the village's land use, identifying agricultural, residential, and commercial zones.<br>• Explore the population distribution, age groups, and socio-economic factors, providing insights into the village's community structure.<br>• Examine cultural practices and heritage elements within the village, contributing to an appreciation of its rich cultural diversity.<br>• Investigate the impact of human activities on the environment, emphasizing sustainable practices for future development in Thabadewadi. |
| **Conclusion** | In conclusion, the geographical village survey has provided valuable insights into the intricate tapestry of Thabadewadi. Through the exploration of its topography, land use patterns, Landuse, demographics, and cultural dynamics, the findings underscore the significance of sustainable practices for the holistic development of Thabadewadi. |

Mr. D. M. Godase
**Co-Ordinator**

Dr.D.A. Gade
**Head**

Prof. (Dr.) M. K. Patil
**Principal**

PRINCIPAL,
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya, K.Mahankal, Dist-Sangli

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**
KAVATHE MAHANKAL, Dist. Sangli (Maharashtra) Pin- 416 405
सम्मादिठ्ठीसमादान
शिक्षण प्रसारक संस्था, कवठे महांकाळ
Principal Prof. (Dr.) M.K.Patil M.Sc., M.Phil.,Ph.D.
Mob. 9405649190
9421185277
Phone- 02341-295220 Email : kmpvp@rediffmail.com
Website : www.pvpkm.org
Jr. College Index No. J 22.04.002

Ref No. PVPMKM/ 2023-24/625

Date : 04/01/2024

प्रति,

मा.सरपंच/ ग्रामसेवक

मौजे घाटडेवाडी

ता. कवठेमहांकाळ जि. सांगली

विषय: ग्राम सर्वेक्षण व भूमी उपयोजन सर्वेक्षणासाठी भेट देण्याबाबत

महोदय

आमच्या महाविद्यालयातील बीए भाग तीन भूगोलशास्त्र विषयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी ग्राम सर्वेक्षण व भूमी उपयोजन सर्वेक्षणासाठी मौजे घाटडेवाडी येथे दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी भेट देणार आहेत. सदर प्रकल्प हा शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा भाग आहे. तरी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना योग्य ते सहकार्य करावे. ही विनंती.

आपला विश्वासू

प्राचार्य
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठेमहांकाळ,जि.सांगली

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**

Kavathe Mahankal, Dist. – Sangli (Maharashtra) Pin – 416405

Principal: Prof. (Dr.) M. K. Patil                    Phone No.: 02341-222014
Website: www.pvpcollegekm.com                    E-mail: kmpvp@rediffmail.com

PVPMKM/      /                                              Date: 05/01/2024

# नोटीस

बी.ए. भाग- 3 मधील भूगोलशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, भूगोल विभागाच्या वतीने प्रकल्प अहवाल तयार करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सदर प्रकल्प अहवालासाठी चे सर्वेक्षण मौजे थबडेवाडी येथे दिनांक 9 जानेवारी 2024 रोजी सकाळी ठीक आठ वाजले पासून आयोजित केला आहे. या प्रकल्प सर्वेक्षणासाठी जे विद्यार्थी अनुपस्थित राहतील त्यांना प्रात्यक्षिक परीक्षेला बसता येणार नाही, होणाऱ्या नुकसानास भूगोलशास्त्र विभाग व महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

विभागप्रमुख

# भूमिउपयोजन सर्वेक्षण
# मौजे थबडेवाडी
# २०२३-२४



## अनुक्रमणिका


| अ॰ नं॰ | तपशील |
|---|---|
| १ | **प्रस्तावना**<br>१.१ क्षेत्र अभ्यासाचे भूगोल विषयातील महत्त्व<br>१.२ सर्वेक्षणासाठी गावाची निवड<br>१.३ भूमिपूजन सर्वेक्षणाचा उद्देश<br>१.४ भूमिपूजनाच्या पद्धती |
| २ | **मौजे थबडेवाडी स्थान**<br>२.१ प्राकृतिक रचना |
| ३. | **मौजे थबडेवाडी येथील लोकसंख्येचे स्वरूप**<br>३.१ लोकसंख्येची कृषी व्यवसाय रचना<br>३.२ शेती सोबत इतर व्यवसाय स्वरूप<br>३.३ शेतमजूर संरचना |
| ४ | **कृषी भूमी उपयोजन**<br>४.१ मौजे थबडेवाडी कृषी भूमी उपयोजनावर परिणाम करणारे<br>४.२ शेती क्षेत्राचे एक स्वरूप<br>४.३ कृषी भूमी उपयोजन<br>अ) खरीप हंगामातील भूमिपूजन<br>ब) रब्बी हंगामातील भूमी उपयोजन<br>क) बागायत शेती प्रकारातील भूमिपूजन<br>ड) बागायत शेती प्रकारातील जलसिंचन सुविधा |
| ५ | **मौजे थबडेवाडी येथील कृषी समस्या** |
| ६ | **निष्कर्ष** |
| ७ | **संदर्भ ग्रंथ सूची** |

## नकाशा सूची

२.१ मौजे थोबडेवाडी स्थानदर्शक नकाशा भूमिपूजन सर्वेक्षण

## तक्ता सूची व आकृती

३.१ शेतीसोबत इतर व्यवसायाचे स्वरूप

३.२ मौजे धबडेवाडी येथील लागवडीखालील क्षेत्राचे भूमी उपयोजन २०२३-२४ विभाजित वर्तुळ

४.१ मौजे धबडेवाडी येथील सर्वसाधारण कृषी भूमिउपयोजन २०२३-२४ विभाजित वर्तुळ

४.२ मौजे धबडेवाडी येथील लागवडीखालील क्षेत्राचे खरीप हंगामातील भूमी उपयोजन २०२३-२४ स्तंबालेख

४.३ मौजे थबडेवाडी येथील लागवडीखाली क्षेत्राचे रब्बी हंगामातील भूमी उपयोजन २०२३-२४ विभाजित वर्तुळ

४.४ मौजे थबडेवाडी येथील लागवडीखालील व्यापारी पिकांचे भूमी उपयोजन २०२३-२४ स्तंबालेख

# आभार

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, बी. ए. भाग -३ या वर्गासाठी भूगोलशास्त्र विषयातील पेपर क्रमांक -१४ मध्ये प्रकल्प अहवाल या अभ्यासक्रमामध्ये समावेश केला आहे. सदर प्रकल्प सर्वेक्षण दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी मोजे थबडेवाडी येथे आयोजन करण्यात आले होते. कारण मौजे थबडेवाडी हे गाव आमच्या कॉलेज पासून ५ कि. मी. अंतरावर आहे.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. के. पाटील यांनी आम्हाला परवानगी देऊन मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. भूगोलशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. दिलीप गाडे यांनी प्रकल्प अहवालासाठी मौजे धबडेवाडी गावची निवड केली आणि त्यांनी सर्वे करण्यासाठी आम्हाला चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले आहे.
डॉ. एन. एस. पोळ. प्रा. डी. एम. गोडसे यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करून आमच्याकडून सर्वे करून घेतला व ते आमच्याबरोबर मित्रत्वाच्या नात्याने राहिले.

तसेच प्राध्यापिका सौ. वैशाली घाटगे व प्राध्यापिका सुवर्णा माने यांनीही सहकार्य केले त्याबद्दल आभारी आहे. सदर प्रकल्पासाठी लागणारी कार्यालयीन माहिती गावातील सुविधा तेथील प्राथमिक माहिती त्या गावचे माजी सरपंच, ग्रामसेवक व गावकामगार तलाठी आणि शिपाई यांनी आम्हाला माहिती दिली त्यांचेही मी आभार मानतो.

संबंधित शेतकरी व गावकरी यांनीही आम्हास क्षेत्र सर्वेक्षणासाठी लागणारी माहिती दिली त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. आमच्या प्रत्येक मित्र-मैत्रिणींनी ही माहिती संकलित करण्यासाठी व टेबल, नकाशे तयार करण्यासाठी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे व ज्यांचेअप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्यांचेही मी मनःपूर्वक आभारी आहे.

आपला विश्वासू

# प्रकरण १

## प्रस्तावना

प्रस्तावना–

ग्रिक कालखंडापासून भू विज्ञानात क्षेत्र अभ्यासात पध्दतीचा उपयोग केलेला आढळतो. पृथ्वीच्या भुपृष्ठावरील एखादया भौगोलिक क्षेत्रास भेट देवून तेथील माहिती संकलित करुन त्याच्या योग्य नोंदी व आराखडा यांच्या सहाय्याने लिहीलेला अभ्यासपूर्ण वृतांत हा वास्तवस्थितीत समजला जातो. आपल्या भोवतालचे पर्यावरण सविस्तर व अचुक समजून घ्यावयाचे असेल तर क्षेत्र अभ्यास (थ्पमसक ॅवता) ही उपयुक्त ठरते. एखादा भौगोलिक प्रदेश इतर प्रदेशापेक्षा प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक बाबतीत भिन्न असतो याचा अभ्यास आधुनिक भूगोलाचे जनक अलेक्झांडर हॉन हंबोल्ट यांनी केलेला आहे. ही भिन्नता प्रामुख्याने जमीनीची उत्पादकता आणि मानवी व्यवसायाचा दर्जा समजून येण्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षणातून केलेल्या नोंदी उपयुक्त ठरतात.

क्षेत्र अभ्यास प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने काही द्वितीय श्रेणीतील माहिती गोळा केली जाते. अलीकडे विशिष्ट भौगोलिक प्रदेशाचे नकाशे तयार करण्यासाठी आणि त्याची माहिती मिळविण्यासाठी हवाई चित्रांचा आणि सुदूर संवेदनातून मिळणा–या प्रतिमांचा समावेश या अद्यावत माहिती तंत्रज्ञानामुळे विस्तृत भौगोलिक प्रदेशाची कमी वेळेत माहिती मिळू शकते. प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून मिळणा–या माहितीस विलंब लागतो. सर्वेक्षकाच्या हातून चुका होण्याच्या शक्यता असतात. म्हणुन अलीकडे सुदूर संवेदन जी. पी.एस.इत्यादीचा वापर अधिक होत आहे. परंतु हे तंत्रज्ञान व उपकरणे या बाबी खर्चीक आहेत. भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या प्रदेशात

प्रचंड मनुष्यबळ आहे. त्याचा उपयोग माहिती संकलनासाठी करणे शक्य आहे.

कवठेमहांकाळ तालुक्यातील मौजे थबडेवाडी येथील भूमिउपयोजन सर्वेक्षणासाठी आम्ही क्षेत्र अभ्यास ही पध्दत निवडली आहे.

१.१ क्षेत्र अभ्यासाचे भूगोल विषयातील महत्व -

सदर अभ्यासासाठी मौजे थबडेवाडी गावच्या भूमिउपयोजनाचे सर्वेक्षण हा अभ्यास विषय निवडला आहे.

भूमीउपयोजन **(Landuse) :-**

भूमी उपयोजनाचे कार्य जमीन, हवा, पाणी व मानव यांच्याशी संबंधित आहे. भूमी हे मानवाचे शरीर समजले तर पाणी हे रक्तवाही त्याचे कार्य करते. त्यासाठी हवा आवश्यक असते आणि या तीन घटकांचा मानव आपल्या सुखी जीवनासाठी वापर करीत असताना हा वापर काही प्रमाणात योग्य तर काही प्रमाणात अयोग्य होत असतो. अयोग्य वापरामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

**Landusea Function of-four variables air, Water, Land and man**

जमीन व पाणी हे सर्व साधनसंपत्तीमध्ये श्रेष्ट समजली जाते कारण ती इतर अनेक साधनसंपत्तींना जागा उपलब्ध करुन देते उदा.पाणी, वनस्पती, खनिज, वसाहती इत्यादीच्या दृष्टीकोनातून भूमी ही महत्वाची साधन संपत्ती आहे. याचा उपयोग मानव वेगवेगळे उपयोग करण्याकरीता करतो. क्रियांची विभागणी प्राथमिक, द्वितीय व तृतीय गटात केलेली आहे. या क्रियासाठी

लागणा-या साधनसंपत्तीचा वापर अनियोजित व अयोग्य पध्दतीने होऊ लागला की अनेक समस्या उध्दभवतात या समस्या निर्माण होवू नयेत किंवा निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी भूमीउपयोजन संकल्पनेचा अवलंब केला जातो.

भौगोलिक अभ्यासात क्षेत्रीय विभिन्नता **(Spatial Distribution)** प्रादेशिक अभ्यास, स्थलकालक अभ्यासाचे महत्वाचे स्थान आहे. भूमीउपयोजन हे स्थलकाल सापेक्ष असते. म्हणजे स्थलानुसार व काळानुसार भूमीउपयोजन बदलत असते. म्हणून भूमीउपयोजनाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) **T.W.Farman** . विशिष्ट क्षेत्रात, विशिष्ट वेळेत, विशिष्ट ठिकाणी व अविकसित भूमीचा केलेला वापर म्हणजेच भूमीउपयोजन होय.

२) एखादया प्रदेशातील साधनसंपत्तीचा, सामाजिक, राजकीय, आर्थीकदृष्टया अतिशय उपयुक्त पध्दतीने केलेला वापरास भूमीउपयोजन म्हणतात.

१.२ मौजे थबडेवाडी गावाची निवड -

आमच्या महाविद्यालयापासून ५ कि.मी. अंतरावर मौजे थबडेवाडी हे गाव असल्यामुळे आणि या गावचे भौगोलिक क्षेत्र मर्यादित असून, आम्ही भूमीउपयोजनासाठी मौजे थबडेवाडी गाव निवडले तसेच महत्वाची गोष्ट म्हणजेच या गावाला दोन तलाव व विहीरीद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

हा प्रदेश पर्जन्यछायेत येत असल्याने हंगामी स्वरुपाचे शेतीस पाणीपुरवठा होतो. ज्यांच्याकडे विहीर व बोअर आहे. ते दोन्ही हंगामात पिके घेतात व या गावात पिक विविधता असल्याने आम्ही मौजे थबडेवाडी हे गाव निवडले आहे.

त्याचप्रमाणे या गावचे माजी सरपंच, सरपंच, ग्रामसेवक, गावकरी, तलाठी यांचे सहकार्य मिळाले. म्हणून आम्ही हे गाव निवडले.

१.३ भूमी उपयोजन सवेक्षणाचा उददेश -

भारत हा विकसनशिल देश आहे. या देशात दिवसें- दिवस साधनसंपत्तीवर लोकसंख्येचा भार वाढत आहे. त्यामुळे दरडोई उत्पन्न कमी व गरजा वाढत आहेत जमीन मात्र मर्यादितच आहे. या मर्यादित जमीनीचा वापर करुन घेतला पाहीजे की जेणेकरुन जास्तीत जास्त त्यातुन उत्पन्न मिळवून मानवी गरजा भागविल्या जातात. या दृष्टीकोनातून भूमीउपयोजनाकडे पाहीले जाते. ही पार्श्वभूमी लक्षात घेवून सदर अभ्यासासाठी पुढील उदिदष्टे ठरविली आहेत.

१) मौजे थबडेवाडी गावच्या भौगोलिक क्षेत्राचे सर्वसाधारण भूमी उपयोजन अभ्यासणे.

२) गावातील कृषी भूमी उपयोजन अभ्यासणे.

३) गावच्या भूमी उपयोजनावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.

४) गावच्या भूमिउपयोजनाच्या समस्या ओळखून त्यावर उपाय सूचविणे.

१.४ भूमिउपयोजनाच्या पध्दती -

प्रत्येक देशाचा आर्थीक व सामाजिक विकास भूमिउपयोजनावर अवलंबुन असतो. त्यासाठी भूमिउपयोजन ही संकल्पना अभ्यासणे व तिची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने अनेक तज्ञांनी आपआपल्या अभ्यास पध्दती सांगितलेल्या आहेत. त्यातील काही प्रमुख पध्दती पुढीलप्रमाणे -

१) निरीक्षण पध्दती

२) मुलाखत पध्दत/तोंडी/प्रश्नावली पध्दत

३) आलेखिय पध्दत

मौजे थबडेवाडी गावचा भूमिउपयोजन अभ्यास करण्यासाठी प्रथम भूमी अभिलेख कार्यालयातुन या गावचा नकाशा मिळाला. तेथील सर्वेक्षण व गट क्रमांक प्रमाणे निरीक्षण व तोंडी मुलाखत पध्दतीद्वारे भूमिउपयोजना संबंधी माहिती संकलित केली. गावकामगार तलाठीयांच्याकडून भूमिउपयोजनाबाबत गत एक वर्षातील सांख्यिकिय आडेवारी उपलब्ध करुन दिली व ही मिळालेली सांख्यिकी आकडेवारी यावर योग्य ते संस्कार, टेबल व आकृत्या आणि नकाशा आलेख, तक्ते यांच्या महत्वाचे संकलित झालेल्या माहितीवर पृथ्थकरण करुन निष्कर्ष काढले यावरुन मौजे थबडेवाडी गावातील भुमी उपयोजनाचा ज्या समस्या लक्षात आल्या, त्यावर उपाययोजना सुध्दा सुचविल्या.

# प्रकरण - २

# प्राकृतिक रचना

मौजे थबडेवाडी गावचे स्थान-

भूगोलशास्त्र अभ्यासामध्ये स्थानाला अनन्यसाधारण महत्व आहे. एखादे गाव नेमके कोणत्या ठिकाणी वसले आहे. त्या ठिकाणावर त्या गावाचा विकास अवलंबुन असतो. म्हणुन ज्या भुप्रदेशावर प्रत्येक गाव वसलेले असते ते त्या गावचे स्थान होय. एखादया गावाच्या इतर क्षेत्राची (राजकीय,सामाजिक,आर्थीक, सांस्कृतिक, ऐतिहासिक,भौगोलिक,घटकांशी असणा-या परस्पर संबंधावर त्या गावाची किंवा ठिकाणांची स्थिती अवलंबुन असते. या परस्पर संबंधावर त्या गावची किंवा ठिकाणाची स्थिती अवलंबुन असते, म्हणुन स्थानाला अनन्य साधारण महत्व आहे. स्थानाला लाभदायक स्थितीची जोड आवश्यक आहे.

आम्ही निवडलेले गावच्या स्थानाला लाभदायक स्थितीची जोड आहे. कारण मौजे थबडेवाडी हे गाव जरी पर्जन्यछायेच्या प्रदेशात वसले असले तरी ते कवठेमहांकाळ शहरा जवळ, शेतीसाठी विहीर, तलाव इत्यादीच्या माध्यमातुन जलसिंचन होते. सखल भाग आहे त्यामुळे तिथे पिकांची काही प्रमाणात विविधता आढळते.

मौजे थबडेवाडी हे गाव कवठेमहांकाळ तालुका ठिकाणापासून ईशान्येला ५ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे हे स्थान लाभदायक आहे. परंतु भुगोल शास्त्राच्या अभ्यासामध्ये एखाद्या देशाचे, राज्याचे, तालुक्याचे गावाचे किंवा प्रदेशाचे स्थान स्पष्ट करताना प्रामुख्याने दोन प्रकारे स्थान व्यक्त केले जाते ते पुढीलप्रमाणे -

१) निरपेक्ष स्थान (भौगोलिक स्थान)

२) सापेक्ष स्थान

म्हणुन मौजे थबडेवाडी गावचे स्थान दोन्ही प्रकारे पुढीलप्रमाणे व्यक्त करता येईल.

२.१ निरपेक्ष स्थान -

मौजे थबडेवाडी गावचे स्थान महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्हयात पुर्वेकडे असणा-या कवठेमहांकाळ तालुक्यात सर्वसाधारण मध्यवर्ती ठिकाण असून, या गावचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ १०९०.२५ हेक्टर आहे. याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३′ उत्तर - १७°५′ उत्तर व ७४°५४′ पूर्व - ७४°५६′ पूर्व रेखावृत्त असा आहे.

२.२ सापेक्ष स्थान -

मौजे थबडेवाडी गावचे सापेक्ष स्थान महत्वाचे आहे. जिल्हयातील कवठेमहांकाळ तालुका हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो. परंतु कवठेमहांकाळ तालुक्यातील थबडेवाडी हे गाव कवठेमहांकाळ पासुन ५ कि.मी. अंतरावर असून, जत - कोल्हापूर हा मार्ग प्रमुख आहे. या मार्गापासून जवळच ४ कि.मी. अंतरावर हे गाव आहे.

२.३ प्राकृतिक रचना -

कवठेमहांकाळ शहराच्या ईशान्येस मौजे थबडेवाडी गावचे क्षेत्र विस्तारलेले आहे. या गावचा बराचसा भाग सखल आहे. तर काही भाग डोंगराळ आहे. तर काही भाग पठारी स्वरुपाचा दिसून येतो. मौजे थबडेवाडीच्या पुर्वेला दक्षिण-उत्तर दिशेस एक ओढा आहे, ओढयाला

पावसाळयामध्ये पाणी असते. याचा उपयोग फक्त जनावरे, पशु, पक्षी यांच्यासाठीच होतो. तसेच गावच्या उत्तरेला दोन मध्यमस्वरुपाचे तलाव आहेत. तेही हंगामी स्वरुपाचे आहेत. पावसाळयात पाणी पुरवठा होतो, तसेच गावठाणच्या बाहेर विहीर संख्या जास्त आहे व त्यापासून शेतीस पाणीपुरवठा उत्तम प्रकारे होतो.


प्रत्यक्ष सर्वे करताना असे दिसून आले की, महाराष्ट्र शासनाने काही शेतक-यांच्या शेतात शेततळी खोदून लहान - मोठे बांध घालुन शेतीला पाणी पुरवठा केला आहे. गावचे शेतीचे क्षेत्र सखल आहे, काही प्रमाणात जगलक्षेत्र सुध्दा आहे. तसेच या गावाच्या जवळ कवठेमहांकाळ, नांगोळे, कुची, ढालगांव अशी काही गावे आहेत. भूमी उपयोजनाच्या दृष्टीने विचार केला तर, तालुक्यातील मौजे थबडेवाडी या गावाला छोटे तलाव, शेततळे, विहीर व बोअर मधून जलसिंचन होते. त्यामुळे पिकांची विविधता पहावयास मिळते म्हणून या गावाची निवड केली.


२.४ सुविधा -

मौजे थबडेवाडी हे गाव जत-कोल्हापूर या मार्गाच्या जवळ ४ कि.मी. अंतरावर वसले असून, एकुण क्षेत्रफळापैकी ४००.७१ हेक्टर (१००१. ७७) एकर बागायत आहे आणि ६३२.०० हेक्टर (१५८० एकर) जिराईत क्षेत्र आहे. जंगले ३२. ८० हे. या गावास प्रादेशिक जल पाणीपुरवठा विहीर व बोअरमधुन जलसिंचन होते. मौजे थबडेवाडी गावठाण व गावठाण बाहेर विहीरीची संख्या १८६, बोअर १५९, शेततळे २, पाझर तलाव २ इत्यादी सुविधा आहेत. याशिवाय १ इलेक्ट्रीक बोर्ड, १ प्राथमिक शाळा, १ अंगणवाडी इत्यांदी आहे. गावात मंदिर, वयक्तिक शौचालय, काही प्रमाणात

पक्के रस्ते आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडाळाची वहातुक सेवा उपलब्ध आहे.

**LOCATION OF VILLAGE THABADEWADI IN KAVATHE MAHANKAL TEHSIL**




मौजे थबडेवाडी कच्चा आराखडा
ता· कवठेमहांकाळ जि· सांगली
N

# प्रकरण ३ रे

## मौजे थबडेवाडी येथील लोकसंख्येचे स्वरुप

आम्ही केलेल्या सर्वेक्षणातुन थबडेवाडी येथे गावातील व शिवाजीनगर खोत वस्ती अशी एकुण ३७६ कुटूंबे कायम वास्तव्य करीत आहेत.

थबडेवाडी गावाची एकुण लोकसंख्या १८९२ इतके असून, त्यापैकी ८९५ स्त्रीया तर ९९७ पुरुष लोकसंख्या आहे. म्हणजेच एकुण लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे शेकडा प्रमाण ४७.३० टक्के पर्यंत असून, ते पुरुष लोकसंख्येच्या प्रमाणात धरल्याली दिसते.

या गावातील लोकसंख्येचे धर्म आणि जात निहाय रचना विचारात घेतल्या तर पुढील चित्र समोर येते मौजे थबडेवाडी मध्ये एकुण लोकसंख्येच्या १०० टक्के संख्या हिंदू धर्माची आहे. इतर कोणत्याही धर्माचे लोक नाहीत.

हिंदू धर्मामध्ये लोणारी समाजाचे प्राबल्य ९७टक्के असून, त्या खालोखाल साधारण २ टक्के धनगर समाज व १ टक्का इतर समाज आढळतो. हिंदू धर्मातील लोणारी या प्रमुख जाती व्यतिरिक्त धनगर इतर जातीचे लोक अत्यंत अल्प प्रमाणात आहेत. अशाप्रकारे जातीनिहाय लोकसंख्येची रचना मौजे थबडेवाडी या गावची आढळते.

### ३.१ मौजे थबडेवाडी येथील लोकसंख्येची कृषी व्यावसायिक रचना –

मौजे थबडेवाडी या गावामध्ये एकुण ९८५ इतकी लोकसंख्या कृषी व्यवसायामध्ये कार्य करत असलेली दिसते. हे प्रमाण गावातील एकुण लोकसंख्येच्या ५२.०६ टक्के दिसते. प्रत्यक्ष शेती करणा–या गावातील एकुण

लोकसंख्येमध्ये ४९.२३ टक्के इतके महिलांचे प्रमाण आढळते. तर ५०.७६ टक्के पुरुष लोकसंख्या कृषी व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

३.२ शेतीसोबत इतर व्यवसायिक स्वरुप -


मौजे थबडेवाडी येथे जे लोक प्रत्यक्ष शेती व्यवसायामध्ये आहेत. यापैकी ते शेतीसोबत जवळ-जवळ २४० (२४.३६%) लोक शेती पुरक व्यवसायामध्ये गुंतलेले आहेतइतर व्यवसाय जोडधंदा म्हणुन करीत असलेले आढळले. या गावात पशुपालन हा प्रमुख शेतीपुरक व्यवसाय आढळतो. कारण या व्यवसायामध्ये गुंतलेले एकुण लोकांपैकी जवळ-जवळ ८३.३३ टक्के लोक पशुपालन हा व्यवसाय करीत असलेले आढळले. ६.२५ टक्के लोक कुक्कुटपालन व्यवसायामध्ये कार्य करीत आहेत. तर नोकरीमध्ये ४.१६ टक्के लोक असून, इतर शेती करीत असलेले आढळले. साधारण ४.१६ टक्के लोक गावात व कवठेमहांकाळ येथे दुकानदार सारख्या व्यवसायात आढळून आले व २.८ टक्के लोक इतर व्यवसाय करतात.

मौजे थबडेवाडी तक्ता क्र.१ पहा या गावास कवठेमहांकाळ तालुका जवळ असल्याने व्यवसायिक स्वरुपावरती परिणाम झालेला आढळतो. या विवेचनावरुन असे म्हणता येईल की, शेती सोबत मौजे थबडेवाडी येथे पशुपालन, कुक्कुटपालन, दुकाने इत्यांदी दुय्यम किंवा पुरक व्यवसाय म्हणुन प्रचलित झालेले दिसतात.

# OCCUPATION STRUCTURE-2023 -24

**Table No. 1 Occupation Structure in village Thabadewadi**

| Sr. No. | Occupation types | No. of People | % |
|---|---|---|---|
| 2 | Poltery | 15 | 6.25 |
| 3 | A.Husbandary | 200 | 83.33 |
| 4 | Service | 10 | 4.16 |
| 5 | Shops | 10 | 4.16 |
| 6 | Other Occupation | 05 | 2.8 |
| Total | | 240 | 100 |




३.३ मौजे थबडेवाडी येथील शेतमजूर रचना –

थबडेवाडी येथील २३ टक्के शेतकरी आपल्या शेतातील सर्व कामे स्वत: करीत असलेला आढळले. तर ५३ टक्के शेतक-यांना शेतीच्या कामामध्ये मजूरीची गरज लागते. तसेच या गावातील २३ टक्के शेतकरी

कुटूंबातील व्यक्ती स्वतःच्या शेतीचे काम करुन इतर शेतक-याकडे मजूरीसाठी जातात. त्यामध्ये पुरुष व स्त्रीयांचे प्रमाण जवळपास सम-समान असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे या गावामध्ये नेहमी शेतमजुरी करणा-या लोकांची संख्या ४२३ इतकी असून, एकुण लोकसंख्यांच्या १६ टक्के स्त्रियांचे प्रमाणे आहे.

या गावामध्ये ८ ते २ वेळेत स्त्रियांसाठी मजूरी रु.२०० तर पुरुषांसाठी ३०० रु. इतकी आहे. तर ८ ते ५ साठी स्त्रियांची मजूरी २५० आणि पुरुषांसाठी रु.४०० इतकी आहे.

# प्रकरण ४

## भूमिउपयोजन

प्रस्तावना–

४.१ मौजे थबडेवाडी गावचे भूमिउपयोजन व भूमिउपयोजनांवर परिणाम करणारे घटक

कोणत्याही गावच्या भूमिउपयोजनावर त्या गावाभोवतालचे निरनिराळे पर्यावरणातील घटक परिणाम करत असतात. भूमि ही एक साधन संपत्ती असून, तिचा उपयोग सुयोग व नियोजनात्मक करणे हे तेथील लोकांच्या अधिक्यात असते. भूमीचा उपयोग नियोजनात्मक केल्यास फायदेशिर असते. अन्यता त्या गावचा विकास कमी होत जातो.

भूमिउपयोजन हे त्या ठिकाणी असणा–या प्राकृतिक व अप्राकृतिक घटकावर अवलंबुन असते. कोणत्याही गावचा भूमिउपयोजनावर प्रामुख्याने पुढील घटक परिणाम करतात.

१)प्राकृतिक किंवा नैसर्गिक घटक

२)अप्राकृतिक किंवा सांस्कृतिक घटक

४.१.१ प्राकृतिक घटक –

यामध्ये भूपृष्ठाच्या हवामान, पाणी, वनस्पती इत्यांदी घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो. भुपृष्ठरचनेमधील संबंधित गाव पर्वत पठार मैदान यापैकी कोणत्या घटकावर वसलेले आहे, ते महत्वाचे असते. हवामान घटकावरील तापमान, वायुभार, आद्रता, वारे, पर्जन्य, दव, धुके त्याचबरोबर जमीन कोणत्या प्रकारची आढळते. मातीचे थर सुपीकता उतार इत्यांदी

घटकांचा समावेश होतो. पाणी हे मानवाची प्राथमिक गरज आहे. त्यासाठी कोणते स्त्रोत आहेत (नदी,तलाव, कालवा,विहीर,बोअर) इत्यादींचा अभ्यास प्राकृतिक घटकात केला जातो. तेथ वनस्पती कोणत्या प्रकाराच्या आढळतात, हे ही लक्षात घेतले पाहीजे. त्याचबरोबर भूमिगत पाण्याचा साठा उपलब्ध करणे. भुमिगत पाण्याची पातळी यासारखे सर्व प्राथमिक घटक भूमिउपयोजनावर परिणाम करत असतात.

मौजे थबडेवाडी भूमिउपयोजनावर सर्व साधारणपणे भूपृष्ट रचना, हवामान, मृदा, पाणी, नापीक जमीन, बाजारपेठ इत्यांदी घटकांचा प्रभाव असलेला दिसतो.

१) भुपृष्ट रचना -

मौजे थबडेवाडी हे गाव सांगली जिल्हा कवठेमहांकाळ तालुक्यात असून, कवठेमहांकाळ च्या ईशान्येस आहे. प्रदेश पठारी स्वरुपाचा असून, गावच्या उत्तरेस दोन तलाव आहेत व गावठाण आणि गावठाण बाहेर विहीरीची संख्या जास्त आहे. एक ओढा आहे, पुर्वेकडून पश्चिमेकडे ओढा वाहतो. तेथे जमीनीचा उतार मंद स्वरुपाचा असल्याने शेतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे.

२) हवामान-

मौजे थबडेवाडी गावचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे, वार्षिक सरासरी तापमान ४०° ते २७° से. या दरम्यान आढळते.

३) मृदा -

मौजे थबडेवाडी गावच्या दक्षिणेकडून पूर्व - पश्चिम दिशेस एक ओढा जातो. ओढयाच्या काठावरील जमीनी चांगल्या आहेत. काळी कसदार जमीन

आहे, तर गावाच्या दक्षिणेकडील भागाची जमीन मुरमाट प्रकाराची आहे. या मुरमाड जमिनीवर ६ ते ९ इंच तांबडी रंगाच्या मातीचा थर आहे. गावाच्या पूर्व, पश्चिम व उत्तरेकडे जमीन काळया मृदेची आहे.

४) पाणी (जलसिंचन)

थबडेवाडी गावच्या उत्तरेला दोन मोठे पाझर तलाव आहेत व गावच्या जवळच पूर्व - पश्चिम दिशेत एक ओढा आहे. ओढयाच्या काठाला विहीर व बोअर आहे. तलाव व ओढयापासून हंगामी जलसिंचन होते. विहीर व बोअर चा काही शेतक-यांना बारमाही पाणीपुरवठा होतो. तेथील शेती व पाण्यासाठी गोडया पाण्याचा पुरवठा होतो.

५) पिकाऊ पडीक जमीन-

मौजे थबडेवाडी क्षेत्रात तात्पुरत्या पडीक जमीनींचे क्षेत्र दक्षिण - उत्तरेकडे व ईशान्य बाजूस असलेले दिसून येते. गावच्या उत्तरेकडे मुरमाड जमीन आहे, दक्षिणेकडे जमीन मुरमाड जमीन आहे. त्यामुळे पिके घेतली जात नाहीत. याचा अप्रत्यक्ष परिणाम भूमीउपयोजनावर झाला आहे.

६) बाजारपेठ-

मौजे थबडेपासून जवळ-जवळ ३५-४० कि.मी अंतरावर मिरज-सांगली बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यामुळे तेथील शेतीतून नगदी पिके घेण्याचा कल कमी आहे. बाजारपेठ दूर अंतराव असल्यामुळे नगदी पिके कमी प्रमाणात आढळतात. तेथे खरीप व रब्बी पिके घेतली जातात. याशिवाय थोडया प्रमाणात द्राक्षे, ऊस, डाळींब चिकु व इतर भाजीपाला यांचा समावेश होतो.

अशाप्रकारे मौजे थबडेवाडी भूमी उपयोजनावर वरील प्रतिनिधीक घटकांसारखे अनेक घटक परिणाम करुन प्रत्येक वर्षी भूमिउपयोजनात कमी-जास्त प्रमाणात बदल आढळतो.

४.१.२ अप्राकृतिक घटक-


यामध्ये सांस्कृतिक व सामाजिक घटकांचा समावेश होतो. एखांदया गावात राजकीय वारसा असतो. त्यामुळे त्या गावचा भूमिउपयोजनात बदल होतात. त्या गावची लोकसंख्या जातीधर्म वाहतुकीच्या सोयी, पाणीपुरवठा, भांडवल पुरवठयाच्या सुविधा व शैक्षणिक सुविधा गावच्या रुढी, परंपरा यांच्यासारख्या सर्व घटकांचा अप्राकृतिक घटकांमध्ये समावेश होतो.

४.२ मौजे थबडेवाडी येथील शेती क्षेत्राचे स्वरुप -

या गावामध्ये आम्ही केलेल्या मोजणीनुसार एकुण भौगोलिक क्षेत्र १०९०.२५ हेक्टर, शेतीखालील प्रत्यक्ष क्षेत्र १०३२.७१ हेक्टर आहे. म्हणजे गावाच्या एकुण लोकसंख्येच्या तुलनेत माणसी १.३६ एकर इतकेच आढळते. यापैकी २.०६ टक्के क्षेत्र पडीक असून, एकुण पेराव क्षेत्रापैकी ५७.९६ टक्के क्षेत्रावरती जिराईत शेती होते आणि ३६.७५ टक्के क्षेत्र बागायत शेतीचे आहे. तक्ता ४.१ पहा

टेबल क्रं.४.१ मौजे थबडेवाडी येथील जमिनीचे सर्वसाधारण कृषि भुमिउपयोजन **२०२३-२४**

| अ.नं. | प्रकार | क्षेत्र | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बगायती जमिन | १००१.७७ | ३६.७५ |
| २ | कोरडवाहू जमिन | १५८० | ५७.९६ |
| ३ | पडीक जमिन | ५६.१७ | २.०६ |
| ४ | जंगल क्षेत्र | ८२ | ३.०१ |
| ५ | गावठाणचे क्षेत्र | ५.६७ | ०.२१ |
| एकूण | | २७२५.६१ | ९९.९९ |




कवठेमहांकाळ तालुका महाराष्ट्रामध्ये अवर्षण प्रवणग्रस्त असल्याने या गावात जिराईत शेतीचे व पडीक शेतीचे क्षेत्र अधिक असलेले आढळते, पावसाचे अत्यल्पप्रमाण तसेच दोन पाझर तलाव आहेत. परंतु ते हंगामी स्वरुपाचे असल्याने फक्त खरिपाची पिके मोठया प्रमाणात घेतली जातात. गावात विहीर व बोअरची संख्या जास्त आहे. त्यामुळे रब्बी पिके व

बागायत पिके थोडयाफार प्रमाणात घेतली जातात. तर काही शेतकरी शेततळयाच्या मदतीने शेती करतात.

४.३ मौजे थबडेवाडी येथील कृषि भूमी उपयोजन –

मौजे थबडेवाडी हे गांव अवर्षण प्रवणग्रस्त अशा कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये येत असल्याने या ठिकाणच्या शेतीप्रकार आणि पिक प्रारुपावरती अत्यंत कमी पर्जन्य वितरणाचा प्रभाव पडलेला आहे. त्यामुळेच येथे प्रामुख्याने जिराईत शेतीप्रकार प्रचतित झाला असून, या प्रकारची शेती ६१.१९ टक्के कृषीक्षेत्रावरती आढळते. तसेच गावांच्या वरील बाजूस पाझर तलाव असल्याने त्याद्वारे रब्बी हंगामासाठी पिकासाठी पाणी दिले जाते शिवाय पाझर तलावामुळे तलावाखालील क्षेत्रात भूमीगत पातळीही उंचावली जावून येथे बागाईत शेतीप्रकार सुध्दा तुलनात्मकदृष्टीने विकसित झालेला आहे.

साधारणतः या गावामध्ये खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामातील पिके घेतली जातात. तक्ता क्र.४.३ अ,ब,क मध्ये २०२३-२४ या वर्षातील खरीप, रब्बी आणि बागाईत क्षेत्रामधुन घेतल्या जाणा–या पिकाखालील क्षेत्र नमुद केले आहे. तक्ता ४.२ पहा

अ) खरीप हंगामातील भूमी उपयोजन–


वरील तक्त्यावरुन पुढील गोष्टी स्पष्ट होतात. सन २०२३-२४ या सालामध्ये मौजे थबडेवाडी येथील कृषीक्षेत्रावरती एकुण १८९० एकरामध्ये खरीप हंगामातील वेगवेगळी पिके घेण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने खरीप, ज्वारी, बाजरी, मका, भुईमूग,मुग, सोयाबिन, मटकी आणि तुर या पिकांचा समावेश होतो. त्यापैकी सर्वात अधिक म्हणजे

३७.६६ टक्के क्षेत्र एकटया ज्वारी खाली होते. म्हणजे खरीप हंगामातील हे प्रमुख पिक ठरते. बाजरीसाठी ३७.०३ टक्के क्षेत्र लागवडीखाली असल्याने हे याच हंगामातील दुस-या क्रमांकाचे पिक ठरते. याशिवाय १४.५५ टक्के क्षेत्र मका या पिकाखाली आढळते.

खरीप हंगामात ज्वारी,बाजरी आणि मका या तीन प्रमुख पिकाव्यतिरिक्त यासोबतच ५.८२ टक्के क्षेत्र भुईमुग, मुग, तूर व मटकी इत्यादी पिकेही येथे घेतली जातात.

## Table 4.2 Land Use in Kharip Season- 2023-24

| Sr. No. | Type of Crop | Area in Acar | Percentage |
|---|---|---|---|
| 1 | Jwar | 710 | 37.65 |
| 2 | Bajara | 700 | 37.3 |
| 3 | Maize | 275 | 14.00 |
| 4 | Pulses | 65 | 5.82 |
| 5 | Vegetables | 140 | 6.22 |
| | Total | 1890 | 100 |




ब)रब्बी हंगामातील भूमीउपयोजन -

मौजे थबडेवाडी येथे पाझर तलावाचा पाणीपुरवठा उपलब्ध होते. त्यामुळे या गावातील शेती उत्पादनाच्या दृष्टीने रब्बी हंगामसुध्दा अत्यंत महत्वाचा ठरतो. या हंगामामध्ये १५६० एकराचे क्षेत्र सन २०१७-२०१८यावर्षी विविध पिकाखाली आढळते. या हंगामामध्ये रब्बी, ज्वारी, शाळू हे पिक प्रमुख असून, त्याखाली ६०.२५ टक्के क्षेत्र होते. त्या खालोखाल गहु १८.९१ क्षेत्रावरती तर कडधान्य ०.९६ टक्के क्षेत्रामधुन या हंगामात घेतला जातो व १६.०२ टक्के सर्वसाधारणपणे मक्याचा वापर पशुखादय म्हणुन पशुपालन व्यवसायामध्ये केला जातो. या व्यतिरिक्त पुरक स्वरुपात खपलीचे पिक दिसते.

## Table 4.3 Land Use in Rabbi Season- 2023-24


| Sr. No. | Type of Crop | Area in Acar | Percentage |
|---|---|---|---|
| 1 | Jwar | 940 | 60.25 |
| 2 | Maize | 250 | 16.02 |
| 3 | Pulses | 15 | 0.96 |
| 4 | Wheat | 295 | 18.91 |
| 5 | Vegetables | 60 | 3.85 |
| Total | | 1560 | 100% |



## Table 4.4 Land Use in Irrigated Land

## (Cash Crop-2023-24)

| Sr. No. | Type of Crop | Area in Acar | Percentage |
|---|---|---|---|
| 1 | Sugarcane | 250 | 24.95 |
| 2 | Grapes | 500 | 49.91 |
| 3 | Banana | 2.5 | 0.25 |
| 4 | Pomgranate | 125 | 12.47 |
| 5 | Vegetables | 124.27 | 12.40 |
| Total | | 1001.77 | 99.98 |



## मौजे थबडेवाडी लागवडीखालील क्षेत्राचे भूमी उपयोजन - **२०२३-२४**

| अ.नं. | पिकाचे नांव | खरिप हंगाम | | रब्बी हंगाम | | बगायत पिके | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण क्षेत्र (एकर) | शेकडा प्रमाण | एकूण क्षेत्र (एकर) | शेकडा प्रमाण | एकुण क्षेत्र | शेकडा प्रमाण |
| १ | ज्वारी | ७१० | ३७.६६ | ९४० | ६०.२५ | | |
| २ | बाजरी | ७०० | ३७.३० | | | | |
| ३ | मका | २७५ | १४.५५ | २५० | १६.०२ | | |
| ४ | कडधान्य | ६५ | ०५.८२ | १५ | ०.९६ | | |
| ५ | गहू | | | २९५ | १८.९१ | | |
| ६ | ऊस | | | | | २५० | २४.९५ |
| ७ | द्राक्षे | | | | | ५०० | ४९.९१ |
| ८ | केळी | | | | | २.५ | ०.२५ |
| ९ | डाळींब | | | | | १२५ | १२.४७ |
| १० | भाजीपाला | १४० | ६.२२ | ६० | ३.८५ | १२४.२७ | १२.४० |
| | | १८९० | १०० | १५६० | १०० | १००१.७७ | १०० |

# प्रकरण ५

## कृषिसमस्या

### मौजे थबडेवाडी भूमीउपयोजनातील समस्या

मौजे थबडेवाडी भूमीउपयोजन निरनिराळया घटकांवर अवलंबून आहे. यामध्ये नैसर्गिक, आर्थीक, सामाजिक व इतर अनेक घटक परिणाम करतात ते पुढीलप्रमाणे -

१ नैसर्गिक व आर्थीक घटक -

यामध्ये प्रामुख्याने हवामान, पाणी, जमीन, भांडवल, विज, रासायनिक खते मजूर इत्यांदीचा समावेश होतो. म्हणुन ते घटक पुढीलप्रमाणे -

२. पाण्याची समस्या -

थबडेवाडी गावात प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबुन रहावे लागते. तसेच भूमिगत कोणतेही नदी वाहत नाही. गावाच्या पूर्वेस एक ओढा आहे. हा ओढा असला तरी पावसाळयातील काही दिवस वगळता कोरडा असतो. त्यामुळे पाण्याची टंचाई येथील पिकांना व ग्रामस्थांना जाणवते व या गावामध्ये एक तलाव असून, हा तलाव उन्हाळयामध्ये कोरडा असतो. थोडक्यात मार्च ते जून दरम्यान मौजे थबडेवाडीस पाणी समस्यांना तोंड दयावे लागते. म्हणुन कमी पाण्यावर येणारे डाळींब,द्राक्षे,चिकु व इतर फळबागा यांची निवड येथील भूमीउपयोजनात प्रामुख्याने दिसून येते.

२. हवामान–

या गावचे हवामान उष्ण व कोरडे असून, वार्षिक सरासरी तापमान २४° सेल्सिअस ते ३५° सेल्सिअस या दरम्यान आढळते. वार्षिक सरासरी

पर्जन्य ५० - १०० से.मी. पडतो. त्यामुळे शेतीस योग्य हवामान नाही. तापमान व पर्जन्य यांचा विचार केला असता, पर्जन्य कमी व तापमान जास्त जाणवते शेतीचा विकास नाही.

३.भांडवल समस्या-

मौजे थबडेवाडी येथील सुमारे २० ते २५ टक्के शेतकरी वगळता उर्वरीत शेतक-यांना लागणारे भांडवल शेतीस अपुरे पडते. याचा परिणाम भूमिउपोजनावर झालेला दिसतो. बि-बियाने, खते, यांत्रिक अवजारे इत्यादींसाठी भांडवल आवश्यक असते. परिणाम बहुतांश शेतकरी व्यापारी तत्वाच्या शेतीपासून वंचित आहेत.

४ कृषी यांत्रिकिकरणाचा आभाव -

येथे पारंपारीक पध्दतीची शेती केली जाते. परंतू, डाळींब, द्राक्षे, आधुनिक तंत्राचा वापर केलेला दिसून येतो. काही शेतकरी अजूनही पारंपारीक पध्दतीनेच शेती करतात. त्यामध्ये भांडवल मनुष्यबळ अज्ञान इ. समावेश होतो. आधुनिक शेतीची मशागत पेरणी खते बि-बियाने, फवारणी, कापणी, मळणी इ. परापरांगत आढळतात.

५.वीज -

मौजे थबडेवाडी हे पर्जन्य छायेच्या प्रदेशात येते. त्यामुळे अत्यल्प पाणी आणि ज्या शेतक-याकडे पाण्याची सुविधा आहे. त्या शेतक-यांना विजेचा पुरेपुर पुरवठा होत नाही. अपु-या विजमुळे शेतीस पाणी मिळत नाही.

६.रासायनिक खतांचा तुटवडा –

येथील लोक आर्थीक दृष्टया मागासलेली असल्यामुळे वेगवेगळी रासायनिक खते खरेदी करण्यासाठी पैसे नसतात त्यामुळे शेतीला रासायनिक खते देवू शकत नाही. त्यामुळे शेतीतील उत्पादन कमी प्रमाणात मिळते.

७. मजूर समस्या –

मौजे थबडेवाडी या गावामध्ये मजूर वेळेवर मिळत नाहीत ही एक महत्वाची समस्या पाहावयास मिळाली हे मजूर ज्वारी हंगामामध्ये किंवा द्राक्षे सिजन मध्ये वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे तेथे लोकांना मजूर समस्याला सामोरे जावे लागते.

८.सामाजिक घटक –

यामध्ये लोकसंख्या वाढीमुळे कुटूंबातील विभाजन त्यांचा परिणाम शेततुकडीकरण उदरनिर्वाहाची शेती इतर घटकावर झालेला आहे.

१.जमीनीचे तुकडीकरण –

मौजे थबडेवाडी येथील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. त्याचबरोबर घरगुती वाद व भांडणे यामुळे शेतजमीनीचे विभाजन होवून मानशी कमीत कमी क्षेत्र वाटयास येत आहे. त्यामुळे जमिनीचे लहान लहान तुकडे दिसून येतात. या शेतीच्या तुकडयाचा विकास करता येत नाही.

२.उदरनिर्वाह उपयोजन–

सुमारे ७५ टक्के लोक शेतीकडे चरितार्थीचे साधन म्हणून पाहतात व्यापारी दृष्टीकोन आधुनिक तंत्रज्ञानाचा कमी वापर म्हणून येथील लोकांचा शेती करण्याचा दृष्टीकोण उदर निर्वाहत्मक पध्दतीचा आढळतो.

# प्रकरण ६

## निष्कर्ष

१)मौजे थबडेवाडी येथे एकुण ३३४ कुटूंबे कायम वास्तव्य करीत आहेत.

२)या गावामध्ये स्त्री पुरुष सम-समान असून, स्त्रियांचे प्रमाण ४७.३० टक्के आहे.

३)येथे हिंदू - धर्माचेच लोक राहतात. हिंदूचे प्रमाण ९९ टक्के पेक्षा जास्त आढळते.

४)या गावामध्ये हिंदूच्या सर्व जातीच्या तुलनेत लोणारी समाज सर्वाधिक म्हणजे ९७ टक्के असून, त्या खालोखाल धनगर समाजाची संख्या २ टक्के व इतर १ टक्के, आढळते.

५)थबडेवाडीतील एकुण लोकसंख्येच्या ५२.०६ टक्के लोक शेती या प्रमुख व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

६)येथे शेतीमध्ये गुंतलेल्या एकुण लोकांपैकी ४८ टक्के स्त्रिया आहेत.

७)येथे कृषि व्यवसायामधील प्रत्यक्ष लोकांपैकी ८० टक्के लोक शेती व्यवसायासोबत शेतीपुरक अगर अन्य व्यवसायही करतात. त्यामध्ये प्रामुख्याने पशुपालन व्यवसाय प्रथम क्रमांकावरती दिसतो. कारण या व्यवसायातील १६.३२ टक्के लोक आढळतात.

८)कृषिसोबत कुक्कुटपालन दुकान किंवा हॉटेल अगर नोकरी इत्यांदी दुय्यम व्यवसायही या गावातील लोकांनी निवडले आहे.

९)मौजे थबडेवाडी २३ टक्के शेतकरी स्वतःच्या शेतीतील काम करुन इतर शेतक-यांकडे शेतमजूरीसाठी जातात.

१०)नेहमी शेतमजूरीकरणा-यामध्ये स्त्रियांचे प्रमाण १६ टक्के इतके आहे.

११)मौजे थबडेवाडी मध्ये दरमाणसी शेतजमीनीचे प्रमाण १.३६ एकर आहे.

भूमी घटक -

१)थबडेवाडी मध्ये एकुण कृषीयोग्य क्षेत्रापैकी १५८० एकर क्षेत्रावरती जिराईत आणि १००१.७७ एकर क्षेत्रावरती बागायत शेती प्रचलित केली जाते. तर २.२७ एकर क्षेत्र पडीक आहे.

२)या गावातील बागाईत शेती विकासामध्ये पाझर तलाव याचा फायदा झालेला आहे.

३)थबडेवाडी येथे शेती उत्पादन खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातुन होते.

४)खरीप हंगामामध्ये ज्वारी,बाजरी आणि मका ही तीन प्रमुख पिके असून, एकटया ज्वारीसाठी ३७.६६ टक्के क्षेत्र वापरण्यात येते.

५)रब्बी हंगामामध्ये रब्बी ज्वारी(शाळू) हे प्रमुख पिक असून, त्यासोबत गहू, हरबरा आणि मक्याचे उत्पादन घेतले जाते.

६)मौजे थबडेवाडी येथे प्रामुख्याने ऊस, द्राक्षे, केळी, चिकु आणि मिरची ही पिके बागायत शेती प्रकारातुन घेतली जातात. यापैकी द्राक्षे हे प्रमुख पिक असून, द्राक्षे सर्वात अधिक क्षेत्र आहे.

समस्या -

मौजे थबडेवाडी येथील प्रमुख कृषी समस्या पाणी,विज, रासायनिक खताचा तुटवडा भांडवल मजूर समस्या त्याचबरोबर कॅनॉलसाठी जमीन गेलेली आहे. त्यातुन कोणताही लाभ नाही. स्थावर मिळकती संबंधी वाद इतर प्रमख समस्या आम्हाला या गावामध्ये आढळून आल्या.

संदर्भ ग्रंथसूची


| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखक |
|---|---|---|
| १ | कृषी भूगोल | डॉ.सुरेश फुले |
| २ | Agriculture Geography | Singh & Dhillan |
| ३ | महाराष्ट्र भूगोल शास्त्र संशोधन पत्रिका | महाराष्ट्र भूगोल शास्त्र परिषद |
| ४ | Agriculture Geography | Prof K.s. more – Patil |


GPS Map Camera
Google
Thabadewadi, Maharashtra, India
2VMX+HPM, Thabadewadi, Maharashtra 416405, India
Lat 17.034255°
Long 74.898332°
09/01/24 10:24 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Thabadewadi, Maharashtra, India
2VMX+XVX, Thabadewadi, Maharashtra 416405, India
Lat 17.035379°
Long 74.899576°
09/01/24 10:07 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Thabadewadi, Maharashtra, India
2VMX+FMQ, Thabadewadi, Maharashtra 416405, India
Lat 17.0341°
Long 74.898393°
09/01/24 10:26 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Vithurayachi Wadi, Maharashtra, India
Unnamed Road, Vithurayachi Wadi, Maharashtra 416405, India
Lat 17.018088°
Long 74.902791°
09/01/24 10:31 AM GMT +05:30

दि.०९/०१/२०२४

मा. प्राचार्य,

पी व्ही पी महाविद्यालय,

कवठे महांकाळ, जि. सांगली

विषय – ग्राम व भूमी उपयोजन सर्वेक्षणाबाबत

महोदय,

पी व्ही पी महाविद्यालय, कवठे महांकाळ, भूगोलशास्त्र विभाग भाग तीन च्या सर्व विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ग्रामसर्वेक्षण प्रकल्प अभ्यास अंतर्गत मौजे थबडेवाडी येथे दि. ०९/०१/२०२४ रोजी येऊन ग्राम व भूमी उपयोजन सर्वेक्षण केले आहे. त्याबद्दल ग्रामपंचायत थबडेवाडी आपले आभारी आहे. भविष्यामध्ये अशाच प्रकारच्या उपक्रमांतर्गत आमच्या गावचे मूल्यमापन करण्यास आपल्याकडून सहकार्य मिळावे.

धन्यवाद.

आपला/आपली विश्वासू,

| | | |
|---|---|---|
| ग्रामसेवक | उपसरपंच | LPKHOT<br>सरपंच |
| ग्रामपंचायत थबडेवाडी. | ग्रामपंचायत थबडेवाडी | ग्रामपंचायत थबडेवाडी |
| ता.क.महांकाळ.जि.सांगली | ता.कवठेमहांकाळ,जि.सांगली | ता.क.महांकाळ,जि.सांगली |

**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**

Kavathe Mahankal, Dist. – Sangli (Maharashtra) Pin – 416405

Principal: Prof. (Dr.) M. K. Patil | Phone No.: 02341-222014

Website: www.pvpcollegekm.com | E-mail: kmpvp@rediffmail.com

PVPMKM/ / Date: 10/01/2024

# Field-work completion Certificate

This is certified that a field work organised by Department of Geography, Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavthe Mahankal at **Thabadewadi** Tal. Kavthe Mahankal Dist. Sangli on dated 09/01/2024 has been completed Satisfactorily. In this Field-Work 02 Teachers and 20 Students were Participated.

PRINCIPAL,
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya, K.Mahankal, Dist-Sangli

Shikshan Prasarak Sanstha's

# Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, KavatheMahankal

## Department of Geography

### ATTENDANCE SHEET

**Day & Date: Friday, 09/01/2024**

**Name of Activity: Agriculture Survey (Land use Survey -2024)**

**Co-Ordinator: Dr. Dilip Gade**

| Sr. No. | Name of Student | Class | Sign | |
|---|---|---|---|---|
| 1 | Vagone prajakta Ananda | B.A III | PVagare | 15 |
| 2 | Narale Surekha Bhauso | — " — | SBrale | 15 |
| 3 | Mane Suraj Sarjerao | — " — | S.S.mane | |
| 4 | Punekar Sushamita chhagan | — " — | AB | |
| 5 | Mandle Akshay Anil | — " — | AAMandle | |
| 6 | patil pranav Shivaji | — " — | Pranav | |
| 7 | Londha Sagar Shivaji | — " — | Sagar | |
| 8 | Miraje Saurabh Sudhakar | — " — | SSB | |
| 9 | uttare Akash Dadaso | — " — | AB | |
| 10 | Yamgar Siddant Shivaji | — " — | [illegible] | |
| 11 | Jadhav Avadhut popat | — " — | [illegible] | |
| 12 | Kolkar Satyjit Ramesh | — " — | AB | |
| 13 | Buva Nakusa Narayan | — " — | NBuva | |
| 14 | Salunkhe pratik popat | " | AB | |
| 15 | Bandgar Sagar Govind | " | AB | |
| 16 | Borade pooja Sunil | " | [illegible] | |
| 17 | chavan Rohan prakash | — " — | AB | |
| 18 | Mujawar Shahrukh Mowla | — " — | AB | |
| 19 | patil Ravina Tanaji | — " — | Patil | 15 |
| 20 | Aivale Ritesh Bhanudas | — " — | AB | |
| 21 | kamble yogesh Jaykumar | — " — | YKamble | |
| 22 | patil Dhanashri Ravasaheb | — " — | [illegible] | |

| Sr. No. | Name of Student | Class | Sign |
|---|---|---|---|
| 23 | patil prajakta chandrakant | ✓ | AB |
| 24 | Shingade kavita Namdeo | ✓ | Shingade |
| 25 | Jadhav Sanika Ashok | ✓ | [illegible] |
| 26 | chavan vishal Shahaji | ✓ | V.S. chavan |
| 27 | Mali Abhishek Sunil | ✓ | AB |
| 28 | mane Aniket vishwas | ✓ | AB |
| 29 | Bandagar Sachin Babaso | ✓ | AB |
| 30 | waghmare priya Dhondiram | ✓ | AB |
| 31 | wagh Sourabh Ramachandra | ✓ | [illegible] |
| 32 | Bangare Tejesvini Haushiram | ✓ | T.H. Bhangare |
| 33 | pati Dhanashri Maneshwar | ✓ | D.M. patil |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |